**<u>नि.दि.दा.क्र.७०/२०२४</u>**
भानुदास वि. शकुंतला.
**<u>निशाणी क्र. १०  खाली</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ शरद भानुदास केदारे, वय : ५२ वर्षे, धंदा : मजुरी, रा. क्रांतीनगर, ता. कांदीवली पूर्व, जि. मुंबई यांचा पुढील सरतपास वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस. के. दळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु :</u>**

सदर प्रकरणामध्ये मी माझे पुराव्याचे शपथपत्र ई–फायलींगद्वारे दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी सदर प्रकरणामध्ये ई–फायलींगद्वारे दि. २०.०२.२०२४ रोजीचा गट क्र. १६८ चा ७/१२ उता–याची संगणकीकृत प्रत दाखल केली आहे. ती आता मला न्यायालयीन संगणकावर दाखवण्यात आली. सदर ७/१२ उतारा तोच असल्याने व तो सरकारी कागद असल्याने त्यास **<u>निशाणी क्र. १५</u>** देण्यात येत आहे. तसेच गट क्र. १६८ चे सन १९९६–९७ ते २०१५–१६ पर्यंतचे जुने ७/१२ उतारे यांची साक्षांकित प्रत दाखल केली आहे. ती साक्षांकीत प्रत मला न्यायालयीन संगणकावर दाखविण्यात आली ती तिच असून तो सरकारी कागद असल्याने त्यास **<u>निशाणी क्र. १६</u>** देण्यात येत आहे. आता मला मी ई–फायलींगद्वारे दाखल केलेला प्रतिवादी शकुंतलाबाई हिचा हमीचा नमुना न्यायालयीन संगणकावर दाखविण्यात आला. तो साक्षांकीत प्रतीत व सरकारी कागद असल्याने त्यास **<u>निशाणी क्र. १७</u>** देण्यात येत आहे. मी माझे वडील भानुदास केदारे यांचा मृत्यूचा दाखला अभिलेखावर दाखल केला आहे. तो न्यायालयीन संगणकावर मला दाखविण्यात आला. तो मूळ प्रतीत असल्याने तसेच तो सरकारी कागद असल्याने त्यास **<u>निशाणी क्र. १८</u>** देण्यात येत आहे. मी दाखल केलेले माझे मूळ प्रतीतील आधारकार्ड मला न्यायालयीन संगणकावर दाखविण्यात आले. त्यातील माहिती साक्षीदाराने खरी व बरोबर असल्याचे सांगून त्याचा फोटो ओळखला. सदर मूळ प्रतीतील आधार कार्डला **<u>निशाणी क्र. १९</u>** देण्यात येत आहे. आता मला मी दाखल केलेला फेरफार क्र. २३७१ ची साक्षांकित प्रत न्यायालयीन संगणकावर दाखविण्यात आली. तो सरकारी कागद असल्याने त्यास **<u>निशाणी क्र. २०</u>** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

वारंवार पुकारा केला असता प्रतिवादी व वकील गैरहजर असल्याने प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब असा आदेश पारीत केला.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by
SATISH YASHWANT
WAKCHAURE
Date: 2025.03.01
17:35:02 +0530

दिनांक : ०१/०३/२०२५
गंगापूर.

(एस.वाय. वाकचौरे)
३ रे सहदिवाणी न्यायाधीश,क. स्तर
गंगापूर.